कल्याण डोंबिवली महानगरपालिका

जा.क्र.कडोंमपा/नरवि/बांप/डोंवि/126/2016/

दिनांक :- 13/07/2016.

| क.ल.न.-५ | |
|---|---|
| दस्त क्र. ४५६० | २०२१ |
| २८ | ५२ |

(बांधकाम प्रारंभप्रमाणपत्र मंजुरी)
ह.वि.ह.क्षेत्र २२००.०० चौ.मी.
श्री. शैलेश अर्जुन म्हात्रे
द्वारा - वास्तुशिल्पकार - श्री.निलेश दिक्षित अँन्ड असोशिएटस्,

विषय :- स.नं.५८ हि.नं.७अ मौजे-नांदिवली डोंबिवली (पूर्व) येथे बांधकाम करण्याच्या मंजुरीबाबत.

संदर्भ :- आपला दि.०५/०२/२०१६ रोजीचा श्री.निलेश दिक्षित अँन्ड असोशिएटस्, वास्तुशिल्पकार यांचे मार्फत सादर केलेला अर्ज क्र.२३१३७.

महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ४४ तसेच म.प्रा.व न.र.अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये स.नं.५८ हि.नं.७अ मौजे-नांदिवली डोंबिवली (पूर्व) मध्ये २२००.०० चौ.मी. क्षेत्रावर ह.वि.ह.सी.२२००.०० चौ.मी. वर्ट्ई क्षेत्राच्या भुखंडाच्या विकास करावयास मुंबई प्रांतिक महानगरपालिका १९४९ चे कलम २५३ अन्वये बांधकाम करण्यासाठी केलेल्या दिनांक ०५/०२/२०१६ च्या अर्जास अनुसरुन पुढील शर्तीस अधिन राहून तुमच्या मालकीच्या जागेत हिरव्या रंगाने दुरुस्ती दाखविल्याप्रमाणे मागील पानावर नमुद केल्याप्रमाणे रहिवासी, वाणिज्य, सोसायटी ऑफीस वाढे-भिंतीच्या इमारतीच्या जोत्याच्या क्षेत्रापर्यंत बांधकामाबाबत, बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र देण्यात येत आहे. इमारतीच्या व जागेच्या मालकी हक्कासंदर्भात कुठलाही वाद निर्माण झाल्यास त्याला सर्वस्वी आपण जबाबदार राहाल या अटीवर हे संमतीपत्र देण्यात येत आहे.

इमारत : तळ मजला + स्टिल्ट पैकी पहिला मजला ते आठवा मजला (रहिवासी, वाणिज्य,ऑफीस)

सहाय्यक संचालक नगर रचना (डोंवि.)
कल्याण डोंबिवली महानगरपालिका
उ.५ सहाय्यक संचालक नगर रचना
कल्याण डोंबिवली महानगरपालिका

अटी :

१) हे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र दिल्याचे तारखेपासून एक वर्षापर्यंत वैध असेल, नंतर पुढील वर्षासाठी मंजूरीपत्राचे नुतनीकरण मुदत संपण्याआधी करणे आवश्यक आहे. नुतनीकरण करताना किंवा नवीन परवानगी घेताना त्यावेळी अस्तित्वात आलेल्या नियमांच्या व नियोजित विकास योजने अनुषंगाने छाननी करण्यात येईल.
२) नकाशात हिरव्या रंगाने केलेल्या दुरुस्त्या आपल्यावर बंधनकारक राहतील.
३) बांधकाम चालू करण्यापूर्वी सात दिवस आधी महापालिका कार्यालयास लेखी कळविण्यात यावे.
४) ही परवानगी आपल्या मालकीच्या कब्जातील जमीनीव्यतिरिक्त अन्य जमीनीवर बांधकाम/विकास करण्याकरिता देण्यात येत नाही.
५) इमारतीचे बांधकाम या सोबतच्या मंजूर केलेल्या नकाशांप्रमाणे आणि घालून दिलेल्या अटींप्रमाणे करता येईल.
६) वाढेभिंत व जोत्याचे बांधकाम झाल्यानंतर वास्तुशिल्पकाराचे, मंजूर नकाशाप्रमाणे बांधकामाचे बांधकाम केल्याबाबतचे प्रमाणपत्र महानगरपालिकेस सादर करण्यात यावे व ते या कार्यालयाकडून तपासून घेऊन "जोता पुर्णत्वाचा दाखला" घेण्यात यावा व त्यानंतरच पुढील बांधकाम करण्यात यावे.
७) सदर अभिन्यासात कोणत्याही प्रकारचा फेरफार पूर्व परवानगी घेतल्याशिवाय करु नये, तसे केल्यास सदरचे बांधकाम प्रारंभ प्रमाणपत्र, रद्द झाले असे समजण्यात येईल.
८) इमारतीच्या बांधकामाच्या सुरक्षिततेची (स्ट्रक्चरल सेफ्टी) जबाबदारी सर्वस्वी आपले वास्तुशिल्पकार व स्थापत्य विशारद यांचेवर राहील.
९) नकाशांत दाखविलेल्या गाळ्यांच्या संख्येमध्ये व नियोजनामध्ये पूर्व परवानगीशिवाय बदल करु नये तसेच प्लॉटच्या हद्दीत इमारती भोवती मोकळ्या सोडावयाच्या जागेत बदल करु नये व त्यामध्ये कोणत्याही प्रकारचे बांधकाम करु नये.
१०) नागरी जमीन कमाल मर्यादा अधिनियम १९७६ मधील तरतूदी प्रमाणे जागा बाधित होत असल्यास त्याची सर्वस्वी जबाबदारी आपलेवर राहील.